# कौठा येथे फुटलेल्या कालव्याची मंत्री गडाख यांनी केली पाहणी

प्रतिनिधी | कौठा

कौठा येथे पावसाचे पाण्याने भराव खचून फुटलेल्या मुळा उजव्या कालव्याची शनिवारी मृद व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी पाहणी केली.

पावसाचे पाण्याने मातीचा भराव खचून वाहून गेल्याने व संरक्षक दगडी भिंतही पडल्याने मुळा उजवा कालवा कौठा येथील गुप्त पुलाजवळ फुटलेला आहे. मंत्री गडाख यांच्या सुचनेनुसार लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता अकला अहिरराव यांनी नगर मुळा पाटबंधारे विभागाने सादर केलेल्या दुरुस्ती प्रस्तावाला मंजुरी दिलेली आहे. शनिवारी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता अकला अहिरराव, मुळा पाटबंधारेच्या प्रभारी कार्यकारी अभियंता सायली पाटील, उपअभियंता प्रवीण दहातोंडे, महेंद्र राजगुरू, बाळासाहेब भापकर, पद्मसिंह तनपुरे व इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत मंत्री गडाख यांनी प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी जाऊन पाहणी केली. मंत्री गडाख यांनी मुळा पाटबंधारे विभागाचे अधिकाऱ्यांना कालवा व पुलाच्या दुरुस्तीचे काम करण्याबाबत निर्देश दिले.



कौठा येथे पावसाचे पाण्याने भराव खचून फुटलेल्या मुळा उजव्या कालव्याची मंत्री शंकरराव गडाख यांनी शनिवारी पाहणी केली.

**भूमिपूजन** • मंत्री तनपुरे यांचा इशारा, विकासकामात मागे पडणार नाही

# निकृष्ट कामे करणाऱ्यांची गय केली जाणार नाही

## तिसगाव रस्त्याच्या कामाच्या चौकशीचे आदेश, 'दिव्य मराठी'ने वेधले होते लक्ष

प्रतिनिधी | करंजी

पाथर्डी तालुक्यातील मिरी-तिसगाव या रस्त्याचे सहा महिन्यापूर्वीच काम पूर्ण करण्यात आले आहे. या रस्त्याची झालेली दुरवस्था पाहून हे काम पाच वर्षांपूर्वी केलेले आहे की काय असेच प्रवाशांना वाटते. त्यामुळे या रस्त्याच्या कामाची गुणनियंत्रण विभागामार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यापुढील काळात मतदारसंघात निकृष्ट कामे करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, अशा शब्दात मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी प्रशासनाला सुनावले.

तालुक्यातील कडगाव येथे वीस लाख रुपये खर्चाच्या कडगाव ते मोहोजखुर्द या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरण या कामाचे भूमिपूजन मंत्री तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कडगाव येथे झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी मंत्री तनपुरे म्हणाले, सध्या कोरोनामुळे राज्य सरकारच्या तिजोरीमध्ये महसुली उत्पन्न कमी प्रमाणात जमा होत असतानाही मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी प्रामुख्याने निधी आणला जातोय. विकासकामात कुठेही कमी पडणार नाही, मात्र आणलेल्या निधीचा सर्वसामान्य जनतेसाठी सदुपयोग व्हावा या हेतूने अधिकारी व ठेकेदार यांनी प्रत्येक काम क्वॉलिटीचेच करावे, कामाच्या बाबतीत कुठल्या प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही, अशा शब्दात मंत्री तनपुरे यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुनावले. त्याच बरोबर मिरी तिसगाव या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तत्काळ गुणनियंत्रण विभागामार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोषींवर निश्चितपणे कारवाई केली जाईल. मुळा धरणातून सध्या वांबोरी चारीला सोडलेले पाणी हे ओव्हरफ्लोचे आहे, ते बोनस म्हणून घ्या तुमच्या हक्काचे ६८० एमसीएफटी पाणी अजून सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे तुमच्या हक्काचे ते पाणी तुम्हाला गरज पडेल तेव्हा दिले जाईल. या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य अनिल कराळे, ज्येष्ठ नेते कारभारी गवळी, विजय कुटे, के. एम. मचे, माणिकराव लोंढे, बंडू झाडे, शिवसेना नेते दत्तू कोरडे, भागिनाथ गवळी, शिवसेनेचे तालुका संघटक राजेंद्र म्हस्के, युवा सेनेचे तालुकाध्यक्ष अनिल रांधवणे, तालुका उपप्रमुख भारत वांढेकर, अमोल वाघ, जालिंदर वामन, अजय पाठक, सुभाष गवळी, ज्ञानदेव शिरसाठ, नवनाथ मिसाळ, अण्णासाहेब शिरसाठ, महादेव शिरसाठ, बद्री नागरे, चंदू नागरे, विठ्ठल शिंदोरे, अशोक शिरसाठ, सुदाम गीते, सचिन शिरसाठ, छबूराव कोरडे, महादेव शिंदे, गणेश कोरडे आदी उपस्थित होते.



कडगाव (ता. पाथर्डी) येथे रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करताना मंत्री प्राजक्त तनपुरे व ग्रामस्थ. छाया : मयूर मुखेकर.

### कोणीही पाण्यावरून राजकारण करू नये

आम्ही कधीही या भागातील पाणी अडवण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे यापुढे तरी कोणी पाण्यावरून राजकारण करू नये, असा सल्ला मंत्री तनपुरे यांनी विरोधकांना यावेळी दिला.

लोकमंथन

# ‘माझे कुटुंब माझी जबाबदारी’ मोहिमेत आढळगाव व काष्टी अव्वल

श्रीगोंदा/ता. प्रतिनिधी : राज्य सरकारने कोरोनाचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम सुरु केली. या मोहिमेत आढळगाव व काष्टी प्राथमिक आरोग्य केंद्र अव्वल ठरले. या आरोग्यकेंद्राच्या माध्यमातून प्रत्येकी ४५ व ५४ हजार नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तालुक्यातील सात आरोग्य केंद्रात आढळगावचे आरोग्य केंद्र अव्वल ठरले आहे.

राज्य सरकारने कोरोनाचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी आता होम टू होम सर्वेक्षण मोहीम सुरु केली आहे. या मोहिमेच्या अंतर्गत घरोघरी जाऊन प्रत्येक व्यक्तीची तपासणी करण्याचे ठरवले होते. त्यामुळे आरोग्य यंत्रणा अतिशय कामाला लागली आहे. या मोहिमेत अग्रभागी असणारे आरोग्य केंद्र म्हणजे आढळगाव आहे. या आरोग्य केंद्राचा नावलौकिक देशपातळीवर आहे. कारण या आरोग्य केंद्राला तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ शैला डांगे यांच्या काळात या आरोग्य केंद्राला देशपातळीवरील पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या बदलीनंतर ही या आरोग्य केंद्राची नावलौकिकाची परंपरा डॉ. सुशील तुरुकमाने यांनी पुढे चालू ठेवली, त्यांच्यानंतर सध्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत शेळके व डॉ. सुनील पठारे यांनी पदभार घेतल्यानंतर पुन्हा या आरोग्य केंद्राची परंपरा पुढे चालू ठेवली. शासनाने सध्या कोरोनाच्या बाबतीत कोणताही आदेश काढला तरी सुद्धा सगळ्यात अगोदर कामात पुढे असणारे आरोग्य केंद्र म्हणून आढळगावची ओळख आहे. सध्या माझे कुटुंब माझी जबाबदारी या मोहिमेत श्रीगोंदा तालुक्यात सर्वात जास्त काम आढळगाव आरोग्य केंद्राने केले आहे. यामध्ये आढळगाव प्राथमिक आरोग्य केंद्राने सुमारे ४५ हजार व्यक्तींची आरोग्य तपासणी केली आहे त्यामुळे आढळगाव प्राथमिक आरोग्य केंद्र हे तालुक्यात अव्वलस्थानी आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना कोरोनाची तपासणी करण्यासाठी तालुका अथवा जिल्हा स्थरावर जावे लागत होते, पण आता हीच तपासणी आढळगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यात येत आहे. आतापर्यंत ५० व्यक्तींची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी दोन व्यक्ती पॉझिटिव्ह निघाले आहेत अशी माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत शेळके यांनी दिली.

**माझे कुटुंब माझी जबाबदारी**

### आरोग्य केंद्रनिहाय तपासणी केलेल्या व्यक्तींची संख्या

आढळगाव - ४५ हजार, बेलवंडी -३१ हजार २७३, काष्टी - ५४ हजार १४०, कोळगाव - ३७ हजार ४२०, मांडवगण - ३१ हजार ३८५, पिंपळगाव पिसा - २९ हजार ४०८, लोणी व्यंकनाथ -३८ हजार ७२३ असे एकूण २ लाख ६७ हजार ३४९ व्यक्तींची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे यासाठी ९६ टीम कार्यरत आहेत.

### आढळगाव ४५ तर काष्टी ५४ हजार नागरिकांची आरोग्य तपासणी

Activate Windows
Go to Settings to activate Windows.

लोकमत

# रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९० टक्के पार

## नगर जिल्ह्यात ४८१ नवे पॉझिटिव्ह । ७५८ जणांना घरी सोडले

अहमदनगर : जिल्ह्यात शनिवारी ७५८ रुग्णांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ४१ हजार ७५ इतकी झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण ९०.२६ टक्के इतके झाले आहे. शनिवारी एकाच दिवसात ४८१ ने वाढ झाली आहे. यामुळे उपचार सुरु असणाऱ्या रुग्णांची संख्या आता ३ हजार ६९९ इतकी झाली आहे.

जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये ४२, खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ७७ आणि अँटीजन चाचणीत ३६२ रुग्ण बाधित आढळले. एकूण ४८१ मध्ये अहमदनगर (६८), अकोले (४५), जामखेड (३४), भिंगारसह नगर ग्रामीण (१५), नेवासा (३०), पारनेर (१४), राहाता (५२), श्रीगोंदा (१८), कर्जत (१८), कोपरगाव (२०), पाथर्डी (४२), राहुरी (२४), संगमनेर (४८), शेवगाव (३०), श्रीरामपूर (२३) येथील रुग्णांचा समावेश आहे.

- बरे झालेली रुग्ण संख्या : 41,075
- उपचार सुरु असलेले रुग्ण : 3,699
- मृत्यू : 732
- एकूण रुग्ण संख्या : 45,506

शनिवारी ७५८ रुग्णांना बरे झाल्यामुळे घरी सोडण्यात आले. त्यामध्ये नगर शहर १७०, अकोले ३३, जामखेड २९, कर्जत २२, कोपरगाव ३९, नगर ग्रामीण ८०, नेवासा ४९, पारनेर ३३, पाथर्डी ४१, राहाता ४४, राहुरी २४, संगमनेर ६३, शेवगाव ४०, श्रीगोंदा २६, श्रीरामपूर ४८, भिंगार ०३, मिलिटरी हॉस्पिटल ११ आणि इतर जिल्हा ०३ अशा रुग्णांचा समावेश आहे.

लोकमत



कौठा येथील फुटलेल्या कालव्याची पाहणी करताना जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख व इतर.

# फुटलेल्या कालव्याची गडाखांनी केली पाहाणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नेवासा :** तालुक्यातील कौठा येथे पावसाच्या पाण्याने भराव खचून फुटलेल्या मुळा उजव्या कालव्याची शनिवारी मृद व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी पाहाणी केली.

पावसाचे पाण्याने मातीचा भराव खचून वाहून गेल्याने व संरक्षक दगडी भिंतही पडल्याने मुळा उजवा कालवा कौठा येथील पुलाजवळ फुटला आहे. गडाख यांच्या सुचनेनुसार लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता अलका अहिरराव यांनी अहमदनगर मुळा पाटबंधारे विभागाने सादर केलेल्या दुरुस्ती प्रस्तावाला तातडीने मंजुरी दिलेली आहे.

शनिवारी (दि.३) लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता अलका अहिरराव, मुळा पाटबंधारेच्या प्रभारी कार्यकारी अभियंता सायली पाटील, उप अभियंता प्रवीण दहातोंडे, महेंद्र राजगुरु, बाळासाहेब भापकर, पद्मसिंह तनपुरे व इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. गडाख यांनी मुळा पाटबंधारे विभागाचे अधिकाऱ्यांना कालवा व पुलाच्या दुरुस्तीचे काम तातडीने करण्याबाबत निर्देश दिले. यावेळी माजी सभापती कारभारी जावळे, माजी पंचायत समिती अनिल अडसुरे, माजी सरपंच संजय भगत, 'मुळा'चे संचालक बाबूराव चौधरी, शिवाजी दहातोंडे, विजय रक्ताटे, देडगावचे संतोष तांबे, मच्छिंद्र डाके, सरपंच शिवाजी काळे, मच्छिंद्र भासार, महादेव वाघ, कारभारी भावसार, जनार्दन चक्रनारायण, जनार्दन भावसार, कडूभाऊ मोहिते, प्रदीप वाकचौरे, आबासाहेब शेळके, साईनाथ बाघ आदी उपस्थित होते.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

रविवार नगर

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांच्या मदतीसाठी 'उभारी' कार्यक्रम

## नाशिक विभागातील पाच जिल्ह्यात सर्वेक्षण; नगरमधील ३५० कुटुंबे

मोहनीराज लहाडे, लोकसत्ता



आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे सर्वेक्षण नगर जिल्ह्यात सुरू करण्यात आले आहे. राहता तालुक्यातील [illegible] येथे अधिकाऱ्यांनी संबंधित कुटुंबाची भेट घेतली.

नगर : आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना शासकीय नियमाप्रमाणे आर्थिक मदत दिल्यानंतर प्रशासकीय जबाबदारी संपत असली तरी सामाजिक जबाबदारी पूर्ण होत नाही, याकडे लक्ष वेधत विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यात आत्महत्या केलेल्या पात्र शेतकरी कुटुंबीयांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. या सर्वेक्षणात अधिकाऱ्यांनी कुटुंबांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी समजून घ्यायच्या आहेत. योजनांचा लाभ देण्यासाठी त्या कुटुंबाला दत्तक घ्यायचे आहे. त्यासाठी 'उभारी' हा कालबद्ध कार्यक्रम ठरवून दिला आहे.

या कार्यक्रमात गेल्या पाच वर्षांत, सन २०१५ पासून आत्महत्या केलेल्या कुटुंबांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षांत नगर जिल्ह्यात ७१३ जणांनी आत्महत्या केली. पैकी ३५० कुटुंब मदतीसाठी पात्र ठरले आहेत. त्यांचे सर्वेक्षण काल, शुक्रवारी गांधी जयंतीपासून सुरू करण्यात आले आहे. ते दि. ९ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करायचे आहे. या भेटीत अधिकाऱ्यांनी कुटुंबाला शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ देता येईल हे निश्चित करून दि. ३१ ऑक्टोबरपर्यंत लाभ द्यायचा आहे.

'उभारी' कार्यक्रम प्रभावी व संवेदनशील पद्धतीने राबवण्याचे आदेश आयुक्त गमे यांनी दिले आहेत. त्यासाठी तालुकानिहाय पथकेही स्थापन करण्यात आली आहेत. या कार्यक्रमाची पूर्ण जबाबदारी पाचही जिल्ह्यात निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे. कुटुंबाने मागणी केल्याप्रमाणे त्यांना योजनांचा फायदा लाभ मिळाला आहे का, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या नावावरील जमीन, घर, स्थावर मालमत्ता वारसांच्या नावे झाली का, कुटुंबातील कोणी सदस्य स्वयंरोजगारासाठी उत्सुक आहे का, योजना मिळण्यात त्याला काही अडचणी जाणवत आहेत का, या अडचणी सोडवण्यासाठी नियुक्त अधिकाऱ्याने, योजनांच्या विभाग प्रमुखाकडे पाठपुरावा करण्याची सूचनाही आयुक्तांनी केली आहे.

सामाजिक बांधिलकी अंगीकारून नियुक्त केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कुटुंबाचे पालकत्व स्वीकारून महिन्यातून किमान एकवेळ तरी त्या कुटुंबाला भेट द्यायची आहे व अडचणी समजून घ्यायच्या आहेत. आत्महत्याग्रस्त कुटुंबाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या सर्वेक्षणाचा उपयोग होणार असल्याने त्याची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

### तालुकानिहाय पथकांच्या नियुक्त्या

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या भेटी व सर्वेक्षणासाठी तालुकानिहाय पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकात उपविभागीय अधिकारी (नियंत्रण अधिकारी), तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक व उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार (सदस्य सचिव) आहेत. जिल्हा स्तरावरील समितीत निवासी उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), कृषी अधीक्षक, जिल्हा निबंधक, तहसीलदार (महसूल, सदस्य सचिव) व टंचाई विभाग कृषी विभागातील नायब तहसीलदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### नगर जिल्ह्यात पंधरा वर्षांत ८९६ शेतकरी आत्महत्या

नगर जिल्ह्यात गेल्या पंधरा वर्षांत ८९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यामधील ४४९ शेतकरी कुटुंब एक लाख रुपयांच्या मदतीसाठी पात्र ठरले. ४३१ अपात्र ठरले. १६ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. ती सर्व चालू वर्षाची म्हणजे सन २०२० मधील आहेत. जिल्ह्यातील पहिली आत्महत्या सन २००४ मध्ये नोंदवली गेली. सन २०१६ मध्ये सर्वाधिक म्हणजे १४५ आत्महत्या नोंदवल्या गेल्या. सन २०२० मध्ये आतापर्यंत ७४ आत्महत्या नोंदवल्या गेल्या आहेत.

# जिल्ह्यात ४८१ बाधितांची भर

लोकसत्ता प्रतिनिधी

**नगर:** जिल्ह्यात आज, शनिवारी ७५८ रुग्ण बरे झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले तर गेल्या चोवीस तासात ४८१ करोना बाधित आढळले. सहा रुग्णांच्या मृत्यूमुळे एकूण करोनाबळींची संख्या ७३२ झाली आहे.

बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ४१ हजार ७५ इतकी झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण ९०.२६ टक्के झाले आहे. रूग्णसंख्येत ४८१ ने वाढ झाल्यामुळे उपचार सुरू असणाऱ्या रुग्णांची संख्या आता ३६९९ झाली आहे.

जिल्हा रुग्णालयाच्या प्रयोगशाळेत ४२, खाजगी प्रयोगशाळेतील तपासणीत ७७ आणि अँटीजेन चाचणीत ३६२ असे एकूण ४८१ रुग्ण बाधीत आढळले. त्यामध्ये नगर शहर ६८, अकोले ४५, जामखेड ३४, नगर तालुका ७, नेवासे ३०, पारनेर १४, राहता ५२, श्रीगोंदे १८, कर्जत १८, कोपरगाव २०, पाथर्डी ४२, राहुरी २४, संगमनेर ४८, शेवगाव २१ व श्रीरामपूर २३ यांचा समावेश आहे.

दरम्यान, आज ७५८ रुग्ण बरे झाले यामध्ये नगर शहरातील १७०, अकोले ३३, जामखेड २९, कर्जत २२, कोपरगाव ३९, नगर तालुका ८०, नेवासा ४९, पारनेर ३३, पाथर्डी ४१, राहाता ४४, राहुरी २४, संगमनेर ६३, शेवगाव ४०, श्रीगोंदा २६, श्रीरामपूर ४८, भिंगार ३, लष्कर रुग्णालय ११ आणि इतर जिल्ह्यातील ३ अशा रुग्णांचा समावेश आहे.

# दिलासादायक... रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९०.२६ टक्के

**नगर करोना अपडेट**

बरे झालेली रुग्ण संख्या : **४१,०७५**
उपचार सुरू असलेले रुग्ण : **३,६९९**
आजपर्यंतचे मृत्यू : **७३२**
एकूण रुग्णसंख्या : **४५,५०६**



**नगर, दि. ३ (प्रतिनिधी)** - जिल्ह्यात आज ७५८ रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ४१ हजार ७५ इतकी झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे आता ९०.२६ टक्के इतके झाले आहे. दरम्यान, काल (शुक्रवारी) सायंकाळी सहा वाजलेपासून आज सायंकाळी सहा वाजेपर्यंत रुग्णसंख्येत ४८१ ने वाढ झाली. यामुळे उपचार सुरू असणाऱ्या रुग्णांची संख्या आता ३६९९ इतकी झाली आहे.

जिल्हा रुग्णालयाच्या करोना टेस्ट लॅबमध्ये ४२, खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ७७ आणि अँटीजेन चाचणीत ३६२ रुग्ण बाधित आढळले. जिल्हा रुग्णालयाच्या करोना टेस्ट लॅबमध्ये बाधित आढळून आलेल्या रुग्णांमध्ये मनपा २२,

अकोले १, जामखेड ४, नगर ग्रामीण ३, नेवासा १, पारनेर १, राहाता १, श्रीगोंदा १, मिलिटरी हॉस्पिटल ८ अशा रुग्णांचा समावेश आहे.

खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत बाधित आढळून आलेल्या ७७ रुग्णांची नोंद एकूण रुग्णसंख्येत घेण्यात आली. यामध्ये, मनपा ३०, कर्जत १, कोपरगाव २, नगर ग्रामीण ४, नेवासा २, पारनेर १, पाथर्डी ३, राहाता २, राहुरी ९, संगमनेर १९, शेवगाव ३, श्रीरामपूर १ अशा रुग्णांचा समावेश आहे.

अँटीजेन चाचणीत आज ३६२ जण बाधित आढळून आले. यामध्ये, मनपा १६, अकोले ४४, जामखेड ▶ पान २ वर...

पान १ वरून...

# दिलासादायक... रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९०.२६ टक्के

३०, कर्जत १७, कोपरगाव १८, नेवासा २७, पारनेर १२, पाथर्डी ३९, राहाता ४९, राहुरी १५, संगमनेर २९, शेवगाव २७, श्रीगोंदा १७, श्रीरामपूर २२ अशा रुग्णांचा समावेश आहे. दरम्यान, आज ७५८ रुग्णांना बरे झाल्यामुळे डिस्चार्ज मिळाला. यामध्ये मनपा १७०, अकोले ३३, जामखेड २९, कर्जत २२, कोपरगाव ३९, नगर ग्रामीण ८०, नेवासा ४९, पारनेर ३३, पाथर्डी ४१, राहाता ४४, राहुरी २४, संगमनेर ६३, शेवगाव ४०, श्रीगोंदा २६, श्रीरामपूर ४८, कँटोन्मेंट ३, मिलिटरी हॉस्पिटल ११ आणि इतर जिल्हा ३ अशा रुग्णांचा समावेश आहे.

# काम निकृष्ट केल्यास गाठ माझ्याशी

## मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा इशारा; कडगाव ते मोहोज रस्त्याचे भूमिपूजन

**मिरी : पुढारी वृत्तसेवा**

रस्ते हे दळणवळणाचे साधन असल्याने रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे झालेच पाहिजे. नागरिकांची रस्त्याची अनेक दिवसांपासून मागणी पूर्ण होत असल्याने कामाचा दर्जा चांगला राखला पाहिजे. रस्त्याचे काम निकृष्ट केल्यास गाठ माझ्याशी राहील, असा इशारा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अधिकारी व ठेकेदार यांना दिला.

राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या स्थानिक विकास निधीतील पहिल्याच विकासकामाचे भूमिपूजन पाथर्डी तालुक्यातील कडगाव येथे करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवदास शिंदोरे होते. माजी जि.प.अध्यक्ष बाबासाहेब भिटे, जिल्हा परिषद सदस्य अनिल कराळे, जवखेडचे सरपंच अमोल वाघ, कडगाव ग्रामपंचायत सदस्य दत्तु कोरडे, भारत वांढेकर, कारभारी गवळी, माणिक लोंढे, के.एम.मचे, अशोक शिरसाट, ज्ञानदेव घोरपडे, सुभाष घोरपडे, सुभाष गवळी, भागीनाथ गवळी, विजय गवळी, विजय कुटे, बद्रीनाथ सोलाट आदी उपस्थित होते.

कडगाव ते मोहोज या रहदारीच्या रस्त्याची अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाल्याने या रस्त्याने वाहने चालवणे अवघड होते. कडगाव येथे जाण्यासाठी मिरी वगळता दुसरा पर्यायी मार्ग नसल्याने गावात बस देखील येणे कठीण होते. ही परिस्थिती कडगाव ग्रामपंचायत सदस्य तथा शिवसेनेचे विभाग प्रमुख दत्तु कोरडे व काही ग्रामस्थांनी मंत्री तनपुरे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर तनपुरे यांनी आमदार निधीतील पहिलाच निधी



कडगाव (ता.पाथर्डी) : कडगाव ते मोहोज रस्त्याचे भूमिपूजन करताना राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे. समवेत पदाधिकारी. (छाया: सचिन नन्नवरे)

कडगावकरांसाठी देऊन ग्रामस्थांना सुखद धक्का दिला.

कडगाव ते मोहोज हा रस्ता झाल्यानंतर कडगावकरांच्या अनेक अडचणी दूर होणार असून, या गावातून बसने प्रवासाचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे ग्रामस्थ, विद्यार्थी व नोकरदार यांना येण्या-जाण्यासाठी असलेली अडचण कायमस्वरूपी दूर होणार असल्याने ग्रामस्थांनी मंत्री तनपुरे यांचे आभार मानले.

यावेळी नवनाथ मिसाळ, अण्णा शिरसाठ, बद्री नागरे, चंदु नागरे, विठ्ठल शिंदोरे, सुदाम गिते, सचिन शिरसाट, छबुराव कोरडे, अशोक काकडे, सुनील कोरडे, महादेव शिंदे, गणेश कोरडे, रमेश कोरडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढारी

# शेतकऱ्यांच्या पंचनाम्यांबाबत कुचराई नको

## राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे; राहुरीमध्ये अधिकाऱ्यांची घेतली तातडीने बैठक

**राहुरी : पुढारी वृत्तसेवा**

राहुरी तालुक्यात खरीप हंगामात अतिवृष्टीने मोठे नुकसान झाले. सरकारी निर्देशांनुसार परिसरात दुप्पट पाऊस झाला. राज्याचे नगरविकास तथा ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी पंचनामे करून घेण्याचे आदेश दिले आहेत.

राहुरी तालुक्यामध्ये यंदाच्या खरीप हंगामात २५९ हजार हेक्टर क्षेत्रावर पिके घेण्यात आली. १८९ टक्के क्षेत्रावर पेरणी झाल्यानंतर शेतकऱ्यांना खरीप पिकांपासून अधिक उत्पादन मिळण्याची अपेक्षा होती. दरम्यान, यंदाच्या पावसाळ्यात मात्र पावसाने शेतकऱ्यांच्या अपेक्षेवर पाणी फेरल्याचे दिसून आले आहे. अपेक्षेपेक्षा अधिक पाऊस झाल्याची नोंद झाली. राहुरी तालुक्यामध्ये सरासरी २१२ टक्के पाऊस झाल्याची नोंद झाली. तीन मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली. याबाबत राज्याचे नगरविकास तथा ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी राहुरीत बैठक घेतली. यावेळी तहसीलदार फसियोद्दीन शेख, गटविकास अधिकारी गोविंद खामकर, कृषी अधिकारी महेंद्र ठोकळे यांच्यासह महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तनपुरे यांनी शेतकऱ्यांबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट निर्देश देताना सांगितले की, पावसाने मोठे नुकसान केले आहे. शेतकरी संकटात असून त्यांना न्याय देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईसाठी पंचनामे करून घेण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. अधिकारी व कर्मचारी यांनी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये झालेल्या नुकसानीची माहिती घ्यावी. नुकसान भरपाईमध्ये एकही शेतकरी वंचित राहता कामा नये. अधिकारी व कर्मचारी यांनी पंचनाम्याबाबत कुचराई करू नये, असा आदेशही दिला आहे.

मागील वर्षीही अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांना ३२ कोटी रुपये नुकसानभरपाईचे मिळाले होते. दरम्यान, यंदाच्या खरीप हंगामात मात्र जास्त नुकसान झाले आहे. मागील वर्षीपेक्षा यंदा अधिक नुकसान झाले असल्याने अधिक मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, बैठकीवेळी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी शेतकरी व इतर नुकसानीबाबत तहसीलदार शेख व कृषी अधिकारी महेंद्र ठोकळे यांनी सविस्तर माहिती दिली. राहुरी तालुक्यामध्ये १० हजार हेक्टर खरीप पिकांचे नुकसान झाले असल्याचा अंदाज कृषी विभागाने शासनाला कळविला आहे. या बाबत महसूल, कृषी विभागाचे पथक शेतकऱ्यांच्या बांधावर जात असल्याची माहिती देण्यात आली आहे.

तहसीलदार शेख, तालुका कृषी अधिकारी महेंद्र ठोकळे, गटविकास अधिकारी गोविंद खामकर यांना तात्काळ पंचनामे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले.



राहुरी : शेतकरी पंचनाम्याबाबत राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी बैठक घेऊन अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

### पाणी गेलेल्या पिकांचेही पंचनामे करा : तनपुरे

अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पाणी काढून दिले आहे. त्या शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. सर्वच शेतकऱ्यांचे पंचनामे केले जाणार आहेत. शासनाकडून भरीव निधी मिळवू, एकही शेतकरी वंचित राहणार नाही, या साठी प्रशासनाला आदेश दिलेले आहे. शासन सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असे मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी सांगितले.

By Ahmednagar Edition
Oct 4, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# नगर शहरात 'माझे कुटुंब..' अभियानाला गती

## महापालिकेच्या पथकांकडून सव्वादोन लाख नागरिकांची तपासणी; कामचुकारांवर नजर

नगर : पुढारी वृत्तसेवा

शासनाच्या निर्देशानुसार शहरात सुरू असलेल्या 'माझे कुटुंब...माझी जबाबदारी' अभियानांतर्गत महापालिकेमार्फत शहरातील नागरिकांची घरोघरी जाऊन तपासणी केली जात आहे. पथकातील कर्मचारी ऑक्सिमीटर, थर्मल स्कॅनद्वारे करत आहेत. कालपर्यंत (दि.१) सुमारे सव्वा दोनलाख नागरिकांची तपासणी पथकांकडून करण्यात आली आहे. मोहिमेत काही कर्मचारी तपासणी करत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे आयुक्तांनी कर्मचाऱ्यांना तंबी देत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली आहे.

महापालिका प्रशासनाने प्रत्येक प्रभागासाठी १० या नुसार सुमारे १७० पथके तैनात केली आहेत. सुमारे ३५० कर्मचारी या मोहिमेसाठी तैनात करण्यात आले आहेत. पथकातील कर्मचाऱ्यांना घरोघरी जाऊन नागरिकांची तपासणी करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. शहरात कोरोना प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी अधिकाधिक तपासण्या करून काढण्याचे प्रयत्न या मोहिमेतून सुरू आहेत. मोहिमेसाठी कर्मचाऱ्यांना २०८ ऑक्सिमीटर, १७५ थर्मल स्कॅनर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

मोहिमेअंतर्गत २ लाख १७ हजार ७७६ नागरिकांची घरोघरी जाऊन तपासणी करण्यात आली. सुमारे ५३ हजार घरांना पथकाने भेटी दिल्या आहेत. संशयितांना तपासणीसाठी पाठविण्यात येत असून, यात काही कोरोना बाधित रुग्णही आढळून आल्याचे समोर आले आहेत.

दरम्यान, अनेक प्रभागातील पथकांकडून केवळ नागरिकांची नावे लिहून घेण्यात येत असल्याच्या व तपासणी होत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त श्रीकांत मायकलवार यांनी कर्मचाऱ्यांना तंबी दिली आहे. ज्या भागात सर्वेक्षण झाले आहे व तिथे रुग्ण आढळलेला नाही, अशा भागात रुग्ण आढळून आल्यास संबंधित पथकातील कर्मचारी व त्यावर नियंत्रण असलेल्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त श्रीकांत मायकलवार यांनी एका आदेशाद्वारे दिला आहे.

> काही कामचुकार कर्मचाऱ्यांमुळे या मोहिमेवर पाणी फेरले जाण्याची शक्यता आहे. मनपाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच याचा अनुभव आला आहे. या अधिकाऱ्यांच्या घरी गेलेले पथक केवळ नावे लिहून घेत तपासणी न करताच तेथून निघून गेले. विशेष म्हणजे, तपासणी कशी करायची, मोहीम कशी राबवायची याची माहिती बैठकीत याच कर्मचाऱ्याने दिली होती. कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा पाहून हे अधिकारीही अवाक् झाले.

पुण्य नगरी

# जिल्ह्यात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९०.२६ टक्के

## आणखी ७५८ रुग्णांना डिस्चार्ज तर ४८१ बाधितांची भर

**अहमदनगर :** जिल्ह्यात काल ७५८ रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ४१ हजार ७५ इतकी झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे आता ९०.२६ टक्के इतके झाले आहे. दरम्यान, शुक्रवारी सायंकाळी सहा वाजले पासून काल सायंकाळी सहा वाजेपर्यंत रुग्ण संख्येत ४८१ ने वाढ झाली. यामुळे बाधितांची एकूण संख्या आता ४५ हजार ५०६ झाली असून सध्या ३ हजार ६९९ जणांवर उपचार सुरू आहेत.

काल जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅब मध्ये ४२, खाजगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ७७ आणि अँटीजेन चाचणीत ३६२ रुग्ण बाधीत आढळले.जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅब मध्ये बाधीत आढळून आलेल्या रुग्णामध्ये मनपा २२, अकोले १, जामखेड ४, नगर ग्रामीण ३, नेवासा १, पारनेर १, राहाता १, श्रीगोंदा १, मिलिटरी हॉस्पिटल ८ अशा रुग्णांचा समावेश आहे.

खाजगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत बाधित आढळून आलेल्यामध्ये, मनपा ३०, कर्जत १, कोपरगाव २, नगर ग्रामीण ४, नेवासा २, पारनेर १, पाथर्डी ३, राहाता २, राहुरी ९, संगमनेर १९, शेवगाव ३, श्रीरामपूर १,अशा रुग्णांचा समावेश आहे.अँटीजेन चाचणीत बाधित आढळुन आलेल्यामध्ये, मनपा १६, अकोले ४४, जामखेड ३०, कर्जत १७, कोपरगाव १८, नेवासा २७, पारनेर १२, पाथर्डी ३९, राहाता ४९, राहुरी १५, संगमनेर २९, शेवगाव २७, श्रीगोंदा १७,, श्रीरामपूर २२ अशा रुग्णांचा समावेश आहे. दरम्यान काल सायंकाळपर्यंतच्या चोविस तासात आणखी सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृत्यूमुखी पडलेल्यांची एकूण संख्या आता ७३२ झाल्याचे कालच्या आहवालात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, काल ७५८ रुग्णांना बरे झाल्यामुळे डिस्चार्ज मिळाला. यामध्ये मनपा १७०, अकोले ३३, जामखेड २९, कर्जत २२, कोपरगाव ३९, नगर ग्रामीण ८०, नेवासा ४९, पारनेर ३३, पाथर्डी ४१, राहाता ४४, राहुरी २४, संगमनेर ६३, शेवगाव ४०, श्रीगोंदा २६, श्रीरामपूर ४८, कॅंटोन्मेंट ३, मिलिटरी हॉस्पिटल ११ आणि इतर जिल्हा ३ अशा रुग्णांचा समावेश आहे.

पुण्यनगरी

# निकृष्ट कामे करणाऱ्यांची गय करणार नाही : ना.तनपुरे

## प्रशासनास मिरी तिसगाव रस्त्याच्या चौकशीचे आदेश



**तिसगाव :** पाथर्डी तालुक्यातील मिरी तिसगाव या रस्त्याचे सहा महिन्यांपूर्वीच काम पूर्ण करण्यात आले असून, या रस्त्याची झालेली दुरवस्था पाहून हे काम पाच वर्षांपूर्वी केलेले आहे की काय असेच प्रवाशांना वाटते. त्यामुळे या रस्त्याच्या कामाची गुणनियंत्रण विभागामार्फत चौकशी करण्याचे आदेश आपण दिले असून, यापुढील काळात मतदारसंघात निकृष्ट कामे करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अशा कडक शब्दात मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी प्रशासनाला सुनावले.

तालुक्यातील कडगाव येथे वीस लाख रुपये खर्चाच्या कडगाव ते मोहोजबुद्रुक या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरण या कामाचे भूमिपूजन मंत्री तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कडगाव येथे झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी मंत्री तनपुरे म्हणाले सध्या कोरोनामुळे राज्य सरकारच्या तिजोरीमध्ये महसुली उत्पन्न कमी प्रमाणात जमा होत असतानादेखील मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी प्रामुख्याने निधी आणला जातोय. विकासकामात कुठेही कमी पडणार नाही मात्र आणलेल्या निधीचा सर्वसामान्य जनतेसाठी सदुपयोग व्हावा, या हेतूने अधिकारी व ठेकेदार यांनी प्रत्येक काम क्वॉलिटीचेच करावे. कामाच्या बाबतीत कुठल्या प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही. अशा कडक शब्दात मंत्री तनपुरे यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुनावले. त्याच बरोबर मिरी तिसगाव या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तात्काळ गुणनियंत्रण विभागामार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, दोषींवर निश्चितपणे कारवाई केली जाईल. मुळा धरणातून सध्या खांबोरी चारीला सोडण्यात आलेले पाणी हे ओव्हरफ्लोचे आहे ते बोनस म्हणून घ्या. तुमच्या हक्काचे ६८० एमसीएफटी पाणी अजून सुरू करण्यात आलेले नाही, त्यामुळे तुमच्या हक्काचे ते पाणी तुम्हाला गरज पडेल तेव्हा निश्चितपणे दिले जाईल. आम्ही कधीही या भागातील पाणी अडवण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे यापुढे तरी कोणी पाण्यावरून राजकारण करू नये असा सल्ला देखील ना. तनपुरे यांनी विरोधकांना दिला. या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य अनिल कराळे, ज्येष्ठनेते कारभारी गवळी, विजय कुटे, के.एम.मचे, माणिकराव लोंढे, बंडू झाडे, शिवसेना नेते दत्तू कोरडे, भागिनाथ गवळी, शिवसेनेचे तालुका संघटक राजेंद्र म्हस्के, युवा सेनेचे तालुकाध्यक्ष अनिल रांधवणे, तालुका उपप्रमुख भारत वांढेकर, युवानेते अमोल वाघ,जालिंदर वामन, अजय पाठक, सुभाष गवळी, ज्ञानदेव शिरसाठ, नवनाथ मिसाळ, अण्णासाहेब शिरसाठ, महादेव शिरसाठ, बद्री नागरे, चंदू नागरे, विठ्ठल शिंदोरे, अशोक शिरसाठ, सुदाम गीते ,सचिन शिरसाठ , छबूराव कोरडे, अशोक काकडे ,सुनील कोरडे, महादेव शिंदे, गणेश कोरडे आदी उपस्थित होते.

# खासगी हॉस्पिटलमधील कोरोना रुग्ण घटले

## आता अन्य आजारांवरही उपचार सुरू; जनजीवन होऊ लागले सुरळीत, नागरिकांनी काळजी घेणे अद्यापही गरजेचेच

| एकूण रुग्ण | बरे झालेले | मृत्यू | उपचार सुरू |
|---|---|---|---|
| ४५ हजार ५०६ | ४१ हजार ७५ | ७३२ | ३ हजार ६९९ |

